पुण्य नगरी
◆ शनिवार, २९ फेब्रुवारी २०२०

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# कोरेगावात विद्यार्थी कॉपी करताना सापडला

**कोरेगाव** / प्रतिनिधी

येथील डी.पी.भोसले महाविद्यालयात बारावीचा गणीताचा पेपर सोडवीताना मोबाईलच्या व्हाट्सअपद्वारे कॉपी करताना एका विद्यार्थ्याला पकडून संबधित विद्यार्थ्यावर कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल संभाजी फाळके रा.सातारारोड ता.कोरेगाव असे या संशयित विद्यार्थ्याचे नाव असून चंद्रकांत पाटील कनिष्ट विद्यालय व महाविद्यालय सातारारोड या महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे.

शुक्रवारी ११ ते २ या वेळेत गणित विषयाचा पेपर होता. सकाळी साडे दहा वाजता येथील डी. पी.भोसले महाविद्यालयातील ब्लॉक क्रमांक १० मधील विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलमध्ये प्रवेश देताना नियमाप्रमाणे पर्यवेक्षिका पद्मा सचिन पलुसकर, सहपर्यवेक्षक एस.एस.जाधव व आर.टी. ढोपे यांनी विद्यार्थ्यांची झाडाझडती घेतली. त्यानंतर एकजण डाव्या मांडीखाली मोबाईल हँडसेट ठेवून प्रश्नपत्रिका सोडवित असल्याचे आढळले. त्यानंतर त्याचा मोबाइल जप्त करून या विद्यार्थ्याची अधिक चौकशी केली असता त्याचे नाव विशाल संभाजी फाळके चंद्रकांत पाटील महाविद्यालयाचा हा विद्यार्थी असल्याची माहिती मिळाली. या घटनेची चौकशी झाल्यानंतर पद्मा सचिन पलुसकर रा. भवानीपेठ सातारा यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर त्यांचेवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.